# बत्तीस प्रकल्पांची निवड; तीन संघांना विजेतेपद



## वाघ अभियांत्रिकीत प्रकल्प स्पर्धा

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन महाविद्यालयाच्या वतीने नुकतेच प्रकल्प प्रदर्शन स्पर्धा झाली. यात दहा विभागांतील तीनशेहून अधिक प्रकल्प सादर करण्यात आले. यात प्राथमिक स्तरावर ३२ प्रकल्पांची निवड करण्यात आली. तसेच तीन प्रकल्पांना पारितोषिके देण्यात आली.

स्पर्धेचे उद्घाटन व पारितोषिक वितरण सोहळा प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी मंचावर अधिष्ठाता डॉ. प्रीती भामरे, प्रा. नितीन शहाणे, परीक्षक प्रेमलता मिश्रा, अजित तांबे, देवेश सोनवणे, प्राध्यापकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. स्पर्धेत एकूण ३२ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

- स्पर्धेत पहिले पारितोषिक सिव्हिल विभागातील अथर्व गव्हाणे, योगेंद्र राजपूत, सौम्य सोनवणे व वरुण कुलधर यांनी सादर केलेल्या 'साहित्य व्यवस्थापनात एआयचा प्रभावी वापर' या प्रकल्पाला मिळाले. त्यांना प्रा.अनुप दुधेकर व प्रा. प्रिया रकिबे यांचे मार्गदर्शन मिळाले.
- दुसरे पारितोषिक आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागातील 'ए आय पॉवरड डायग्नोसिस ऑफ न्यूरो डेव्हलोपमेंट डिसऑर्डर', या प्रकल्पाने पटकावले. डॉ. स्नेहल कमलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली जोगित सोनकर, रिद्धी सिंगवी, विधी पटवा व मंदार व्यवहारे यांनी प्रकल्प सादर केला
- तिसरे पारितोषिक कॉम्प्युटर सायन्स विभागातील 'क्लाउड बेस्ड प्रोससिंग अँड स्ट्रीमिंग ऑन इन्सॅट सॅटेलाईट डेटा यूझिंग सीओजी' या प्रकल्पाला मिळाले. कशिश डांगे, रसिका म्हस्के, मृणाल गोरवाडकर व विवेक बेंदरे यांनी प्रा. आर. के. धुर्जड यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प सादर केला. तसेच, दोन उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.

महाराष्ट्र टाइम्स २४-१२-२०२५